# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः04.04.2024** **वारःगुरुवार**

---

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते कर्करोगावरील CAR-T सेल उपचार पद्धतीचं आज मुंबईत लोकार्पण
2. केंद्रिय आरोग्य मंत्रालयाच्या सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना उष्णतेच्या लाटेसंदर्भात मार्गदर्शक सूचना
3. लोकसभा निवडणूकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस
4. iOS इकोसिस्टम उपकरणांसाठी myCGHS ॲपचं आरोग्य मंत्रालयाकडून लोकार्पण आणि
5. राजकीय अथवा विचारसरणीवर आधारित नवीन सैनिक शाळांना परवानगी देण्यात आल्याचं वृत्त निराधार असल्याचं सरकारचं स्पष्टीकरण

**<u>राष्ट्रपती-मुंबई</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज मुंबईला भेट देत असून, IIT बॉम्बे इथं कर्करोगावरील CAR-T सेल थेरपी राष्ट्राला समर्पित करतील. CAR-T सेल थेरपी कर्करोग झालेल्या रूग्णांवर उपचार करण्यासाठी वापरली जाणार असून भारतात IIT बॉम्बे-द्वारे निर्मित कंपनी इम्युनोॲडॉप्टिव्ह सेल थेरपीद्वारे विकसित केली गेली आहे. CAR-T सेल थेरपीची निर्मिती आयआयटी बॉम्बे आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यातील सहयोगातून करण्यात आली आहे. आयआयटी बॉम्बे इथं डिझाइन आणि विकसित केलेल्या या थेरपीचा इम्युनोएसीटीमध्ये एकात्मिक प्रक्रिया विकास आणि निर्मिती करण्यात आली आहे. टाटा मेमोरियलच्या चमूंद्वारे या उपचार पद्धतीवर चिकित्सालयीन तपासणी आणि अभ्यास आयोजित करण्यात आले. CAR-T सेल थेरपी उत्पादन भारताबाहेर उपलब्ध असलेल्या अशा उत्पादनांच्या किमतीच्या तुलनेत खूपच कमी किमतीत अनेकांचे जीव वाचवेल अशी अपेक्षा आहे.

**<u>उष्णतेची लाट</u>**

उन्हाळ्याशी संबंधित आजारांच्या व्यवस्थापन तयारीचा आढावा घेण्यासाठी काल केंद्रिय आरोग्य मंत्री मनसुख मांडवीय यांनी एक बैठक घेतली. याबाबतचे अचूक तपशील उपलब्ध नसल्याचं निदर्शनास आणून देत राज्यांकडून माहिती घेऊन एक सर्वंकष आकडेवारी तयार करणं गरजेचं असल्याचं मांडवीय यावेळी म्हणाले. वरीष्ठ अधिकाऱ्यांनी विविध राज्यांना भेट देऊन त्यांच्या समन्वयानं आणि सहकार्यानं उष्णतेच्या विकारांवरील उपाययोजनांची आखणी करावी असा सल्ला मांडवीय यांनी दिला.

उष्माघाताबाबत जनजागृतीसाठी जिल्हास्तरीय आणि राज्यस्तरीय समित्या स्थापन करणं आवश्यक असल्याचं आरोग्य राज्यमंत्री डॉक्टर भारती पवार या बैठकीत म्हणाल्या. दरम्यान, केंद्रिय आरोग्य मंत्रालयानं सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना नुकताच यासंदर्भात राष्ट्रीय कृती आराखडा पाठवला आहे. उष्णतेच्या लाटेचा सामना करण्यासाठी राज्यांनी कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्याला गती देणं गरजेचं असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>लोकसभा दुसरा टप्पा</u>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस आहे. 12 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या 88 तसंच मणिपूरमधल्या एका जागेसाठी या दुसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे. उद्या उमेदवारी अर्जांची छाननी होईल. जम्मू काश्मीरमधे परवा उमेदवारी अर्जांची छाननी होणार आहे. दुसऱ्या टप्प्यात केरळमधल्या 20, कर्नाटक 14, राजस्थान 13, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातल्या प्रत्येकी 8, मध्य प्रदेशातल्या 7, आसाम आणि बिहारमधल्या प्रत्येकी 5,

पश्चिम बंगाल आणि छत्तीसगडमधल्या प्रत्येकी 3 तर मणिपूर, त्रिपुरा, जम्मू काश्मीरमधल्या एका जागेसाठी 26 एप्रिलला मतदान होईल.

**<u>सरकार औषधे</u>**

औषधांच्या किंमतींमध्ये मोठी वाढ झाल्याचा दावा करणाऱ्या बातम्या खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या असल्याचं सरकारनं घोषित केलं आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं सांगितलं की पाचशेहून अधिक औषधांच्या किंमती वाढल्या असल्याचा खोटा दावा या बातम्यांमध्ये करण्यात आला आहे. औषधनिर्माण विभागाच्या अंतर्गत राष्ट्रीय औषध किंमत प्राधिकरण दरवर्षी घाऊक किंमत निर्देशांकाच्या आधारे सूचिबद्ध औषधांच्या कमाल किंमतींचा आढावा घेत असते. 782 औषधांच्या किंमतींमध्ये कोणताही बदल नाही तर 54 औषधांच्या किंमतीत नगण्य एक पैशाची वाढ होईल.

**<u>भारत जागतिक बँक</u>**

2024 मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर साडेसात टक्के राहील असं जागतिक बँकेनं म्हटलं आहे. याआधी 2024 मध्ये विकास दर 1 पूर्णांक 2 दशांश टक्के राहील असा अंदाज जागतिक बँकेनं वर्तवला होता. दक्षिण आशियाई देशांचा बँकेनं नुकताच आढावा घेतला. यात दक्षिण आशियाई देशांचा एकत्रित विकासदर 6 टक्के असेल याला भारताची वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था तसंच पाकिस्तान आणि श्रीलंकेतली सुधारलेली परिस्थिती कारणीभूत आहे असं जागतिक बँकेनं म्हटलं आहे.

**<u>तैवान भूकंप</u>**

तैवानमध्ये काल सकाळी झालेल्या भूकंपामुळे आतापर्यंत 9 जणांचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. हुआलिन या डोंगराळ भागाला आणि राजधानी तैपेईला या भूकंपाचा सर्वाधिक फटका बसला. गेल्या 25 वर्षातल्या या सर्वात शक्तीशाली भूकंपात 900 नागरिक जखमी झाले असून अनेक ठिकाणी दरडी कोसळल्या. अद्याप ढिगाऱ्याखाली अडकलेल्या 100 नागरिकांचा शोध घेण्याचं काम सुरू आहे.

**<u>तैवान मदत</u>**

भूकंपाच्या या कठीण काळात भारतानं केलेल्या मदतीसाठी तैवान सरकारनं पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार मानले आहेत.

**<u>ऑस्ट्रेलिया नौदल-भारत</u>**

रॉयल ऑस्ट्रेलियन नौदलाचे प्रमुख व्हाईस ॲडमिरल मार्क हॅमंड यांनी काल नवी दिल्लीत भारतीय नौदल प्रमुख ॲडमिरल आर हरी कुमार यांची भेट घेतली. बैठकीदरम्यान, त्यांनी द्विपक्षीय सागरी सहकार्य बळकट करण्याच्या मार्गांवर चर्चा केली, त्यात वाढीव परिचालनात्मक सहभाग, प्रशिक्षण देवाणघेवाण आणि माहितीची देवाणघेवाण यांचा समावेश आहे. तत्पूर्वी, मार्क हॅमंड यांनी राष्ट्रीय युद्ध स्मारकावर विधीवत पुष्पहार अर्पण केला. आपल्या पाच दिवसांच्या दौऱ्यात मार्क हॅमंड हे भारतीय नौदलाच्या कोची इथलं दक्षिण नौदल कमांड आणि मुंबईतील वेस्टर्न नेव्हल कमांडला भेट देतील. भारत-प्रशांत क्षेत्रामधील अनेक समकालीन सागरी सुरक्षा मुद्द्यांवर भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या दृष्टीकोनात समानता असल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>आरोग्य- CGHS ॲप</u>**

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाचे सचिव अपूर्व चंद्रा यांनी काल नवी दिल्ली येथे iOS इकोसिस्टम उपकरणांसाठी myCGHS ॲपचा आरंभ केला. केंद्र सरकारी आरोग्य योजना म्हणजे CGHS लाभार्थ्यांसाठी इलेक्ट्रॉनिक आरोग्य नोंदी, माहिती आणि साधनांची सुविधा वाढविण्यासाठी ॲपची रचना करण्यात आली आहे. अँड्रॉइड सिस्टीमसाठी हे ॲप आधीच उपलब्ध होते. पत्रकारांशी बोलताना चंद्रा म्हणाले की, myCGHS ॲपवर ऑनलाइन भेटीची वेळ ठरवणे आणि रद्द करणे, CGHS प्रयोगशाळेतून अहवाल मिळवणे, औषधांचा इतिहास तपासणे, वैद्यकीय प्रतिपूर्ती दाव्याची स्थिती तपासणे, संदर्भ तपशील, नजिकची कल्याण केंद्र आणि सूचिबद्ध रुग्णालयं शोधणे यासह विविध सेवांची सुविधा आहे. CGHS योजना बंद करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही असं सांगून

अपूर्व चंद्रा म्हणाले की ABHA कार्ड ही आरोग्यासाठी राष्ट्रीय डिजिटल ओळख असून ती आयुष्मान भारत डिजिटल मिशनचा भाग आहे. 55 कोटींहून अधिक आभा कार्ड आजवर तयार करण्यात आले आहेत.

**सैनिकी शाळा**

राजकीय अथवा विचारसरणीवर आधारित शाळांना नवीन सैनिक शाळा काढण्याची परवानगी देण्यात आल्याचं वृत्त संरक्षण मंत्रालयानं फेटाळून लावलं आहे. 1960 मध्ये सैनिक शाळा सोसायटीच्या माध्यमातून देशात सैनिक शाळांची स्थापना करण्यात आली आहे. या शाळांना मिळालेल्या यशामुळे आणखी सैनिक शाळा स्थापन करण्याची मागणी सातत्यानं होत आहे अशी माहिती मंत्रालयानं दिली. सैनिक शाळांमधल्या अभ्यासक्रम पद्धतीचा देशातल्या तरुण पिढीला फायदा व्हावा या उद्देशानं सरकारनं पहिल्या टप्प्यात देशभरात 100 सैनिक शाळा स्थापन करण्याची योजना आखली आहे. नवीन सैनिक शाळांची योजना विचारपूर्वक आखण्यात आली असून त्यांची निवड प्रक्रिया अत्यंत काटेकोर आहे. या निवड प्रक्रियेत कोणत्याही राजकीय, वैचारिक अथवा संस्थांचा हस्तक्षेप नसतो असं मंत्रालयानं स्पष्ट केलं.

**भूसुरुंग दिवस**

आंतरराष्ट्रीय भूसुरुंग जागरुकता दिवस आज पाळण्यात येत आहे. भूसुरुंगावरील कारवाई, भूसुरुंग, मानवजातीच्या सुरक्षिततेला त्याचे धोके आणि त्यांचे उच्चाटन करण्याच्या दिशेनं कसं कार्य करावं याकडे लोकांचं लक्ष वेधण्यासाठी दरवर्षी हा दिवस पाळला जातो. 2024 च्या आंतरराष्ट्रीय भूसुरुंग जागरुकता दिनाची मध्यवर्ती संकल्पना जीवांचे संरक्षण, शांततेची निर्मिती अशी आहे. स्फोटकांमुळे अपंगत्व आलेल्या आणि संघर्षरत दिव्यांग व्यक्तींवर यात लक्ष केंद्रित करण्यात आलं आहे.

**हवामान**

देशाच्या पूर्व आणि द्वीपकल्पिय भागात उष्णतेच्या लाटेचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. तर ईशान्य भागात रविवारपर्यंत वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. अरुणाचल प्रदेशमध्ये जोरदार पाऊस आणि हिमवृष्टी होण्याची शक्यता आहे असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.